# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी

## **सभावृत्तांत**

(कार्यपत्रिका क्र. ४)

दिनांक : १०/०७/२०१४ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जुलै २०१४ ची मासिक सभा गुरुवार दिनांक १०/०७/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य/ सदस्या उपस्थित होते.

१. मा.सौ.सुभद्रा ईश्वर ठोंबरे सभापती
२. मा. बाबर शारदा प्रकाश
३. मा.भारती फरांदे
४. मा.आर.एस.कुमार
५. मा.चारुशिला प्रभाकर कुटे
६. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
७. मा.नेटके सुमन राजेंद्र
८. मा.तरस बाळासाहेब जयवंत
९. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
१०. मा. मोरेश्वर महादू भोंडवे
११. मा.सौ.काळभेर वैशाली जालिंदर

याशिवाय श्री. प्रशांत खांडकेकर-क्षेत्रीय अधिकारी, श्री.एस.एन.इंगळे- कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्री. जी.आर. चिंचवडे, - कार्यकारी अभियंता विद्युत, श्री.लियाकत पिरजादे- कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्रीम. लता बाबर- उपअभियंता विद्युत, श्री.संजय भोसले, श्री.सुनिल वाघुंडे - उपअभियंता स्थापत्य, श्री.डी.एस.सासवडकर – मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.ए.ए.कुलकर्णी– कनिष्ठ अभियंता (जलनि:सारण), इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्माननिय नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.
मा.सभापती यांचे परवानगीने खालीलप्रमाणे ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र. २ मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र
अ क्षेत्रीय कार्यालयाचे विद्युत विषयक कामाची तरतुद वर्ग करणेबाबत.

विषय क्र. ३ मा. चारुशिला प्रभाकर कुटे यांचा प्रस्ताव
रस्त्याचे नामकरण करणेबाबत.

विषय क्र. ४ मा. चारुशिला प्रभाकर कुटे यांचा प्रस्ताव
प्रभाग नं. १५ दत्तवाडी येथील आरक्षण क्रमांक ५४७ ही जागा भूसंपादन करुन घेणेबाबत.

विषय क्र. ५ मा. चारुशिला प्रभाकर कुटे यांचा प्रस्ताव.
प्रभाग नं. १५ दत्तवाडी मधील क्रांतीनगर येथील नाल्यावरील पुलाचे कामाचा निधी स्थापत्यविषयक इतर कामासाठी वर्ग करणेबाबत.

विषय क्र. ६ मा. चारुशिला प्रभाकर कुटे यांचा प्रस्ताव.
संत तुकाराम व्यापार संकूल मधील अस्तित्व मॉल मध्ये विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका व ग्रंथालय सुरु करून त्याचे नामकरण करणे व दत्तवाडीमधील रत्यांचे नामकरण करणेबाबत.

विषय क्र. ७ मा.बाळासाहेब जयवंत तरस यांचा प्रस्ताव.
डी.पी. रस्ता स्थलांतरीत करणेबाबत.

**मा.आर.एस.कुमार:** पथारी/हातगाडीवाले प्रत्यक्षात ज्या ठिकाणी व्यवसाय करतात त्यांना त्याच ठिकाणी व्यवसाय करण्यास परवानगी दिली पाहिजे. एकाच ठिकाणी जास्त व्यवसायीकांना जागा नेमून दिल्यास त्यांचे व्यवसाय चालणार नाही. त्याकरिता प्रत्यक्ष पाहणी करुन त्यांचे शुटींग घेण्यात येवून प्रत्यक्षात व्यवसायाचे ठिकाणीच जागा द्यावयास पाहिजेत. १ मी. x १ मी. ही जागा कमी पडेल.

**क्षेत्रीय अधिकारी:** जागेवर जावून पाहणी केलेली असून त्यानुसारच व्यावसायीकांना जागा नेमून देण्यात येणार आहेत. पात्र व्यक्तींनाच जागा देणेत येणार असून आपल्या सूचनेची दखल घेणेत येत आहे. मा.सर्वोच्य न्यायालय आदेशाप्रमाणे कार्यवाही करणेत येत आहे.

**मा.काळभोर वैशाली जालिंदर:** सांस्कृतिक भवनाचे गेट शेजारी सुचविणेत आलेल्या जागा कमी करणेत याव्यात व त्या इंद्रप्रभा समोर किंवा इतर ठिकाणी देण्यात याव्यात.

**मा.तरस बाळासाहेब जयवंत:** पंचशिल चौकामध्ये हॉकर्स ठेवू नयेत. देहु कॅन्टोमेंट बोर्ड चे हद्दीत त्यांचे परवानगीनुसार जागा देण्यात याव्यात. कॅन्टोमेंट बोर्ड चे हद्दीत ज्या प्रमणे रत्याचा वापर करण्यात येतो त्याच प्रमाणे त्यांची परवानगी घेऊन हॉकर्ससाठी जागा देण्यात याव्यात.

**मा.भारती फरांदे:** प्रभाग क्र.१४ मध्ये डेंग्यूचे रुग्ण आढळून आले आहेत. वॉर्डातील कचरा उचलणे, रस्ते सफाई करणे इत्यादी कामे नियमित करणेबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सुचना देणेत याव्यात.

**क्षेत्रीय अधिकारी:** आरोग्य विभागाने रोटेशननुसार सर्व प्रभागात फवारणी करावी व त्याबाबतची माहिती सन्माननियांना देण्यात यावी.

**मा.तरस बाळासाहेब जयवंत:** प्रभाग क्रमांक १८ मधील रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम अपूर्ण आहे. अधिकारी यांनी स्थानिक नगरसदस्यांसोबत समन्वय ठेवून कामे करावीत. आरोग्य विभागाचे कर्मचारी

ज्या भागात काम करतात त्यांना त्याचे कामाचे ठिकाणी थंब इंप्रेशनची सोय उपलब्ध करुन देण्यात यावी. विद्युत विभागाचे कर्मचाऱ्यांचे कामाचे ठिकाण वारंवार बदली करु नयेत, कारण नवीन कर्मचारी नियुक्त केल्यास त्यांना एरिया माहित होण्यास खूप दिवस लागतात.

**कार्यकारी अभियंता स्थापत्य:** प्रभाग क्रमांक १८ मधील रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम चालू असून येत्या सप्ताहात ते पूर्ण करण्यात येणार आहे.

**मा.शारदाताई बाबर:** प्रभाग क्र. ८ मध्ये गटारांची नियमित सफाई केली जात नाही, याबाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्यात.

खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २२ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : १०/०७/२०१४ | विभाग | : प्रशासन |
| सुचक | : मा. सुमन नेटके | अनुमोदक | : मा. वैशाली काळभोर |

संदर्भ: मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
अक्षेका/६/कावि/२८३/१४ दिनांक ०७/०७/२०१४

मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार मनपा स्तरावर फेरीवाला धोरण राबविण्याची प्रक्रिया चालू आहे. त्यानुसार अ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील सर्व प्रभागामध्ये समक्ष पाहणी करुन सन्मा. नगरसदस्यांचे संमतीने फेरीवाला क्षेत्र निश्चित करण्याकामी आवश्यक ती कार्यवाही करण्यात आलेली आहे. सदरचे झोन निश्चितीचे अवलोकन करण्यात आले असून याबाबत सन्मा. सदस्यांनी सदरचे सभेमध्ये दिलेल्या सूचना विचारात घेऊन अ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात फेरीवाला धोरण निश्चित करणेबाबत प्रस्तावित क्षेत्र निश्चितीनुसार पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २३ | विषय क्रमांक | : २ |
| दिनांक | : १०/०७/२०१४ | विभाग | : विद्युत/लेखा |
| सुचक | : मा. सुमन नेटके | अनुमोदक | : मा. वैशाली काळभोर |

संदर्भ: मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
अक्षे/वि/५/कावि/२३८/२०१४ दिनांक ०९/०७/२०१४

अ क्षेत्रीय कार्यालयाचे विद्युत विभागाकडील महसुली खर्च-देखभाल दुरुस्तीची कामे या लेखाशिर्षावरील र.रु.६६,९०,०००/- तरतुद करण्यात आली असून त्यापैकी र. रु.

१,१०,०००/- सार्वजनिक सुरक्षितता या लेखाशिर्षावर तसेच र.रु.५,५०,०००/- देखभाल दुरुस्तीची कामे या लेखाशिर्षावर सोबतचे तक्त्याप्रमाणे वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २४ | विषय क्रमांक | : ३ |
| दिनांक | : १०/०७/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. चारुशिला कुटे | अनुमोदक | : मा. शारदा बाबर |

संदर्भ: मा. चारुशिला कुटे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १५ मधील अंतर्गत भागात असणा-या मुख्य रस्त्यापासून नाना स्मृती मंगल कार्यालयाकडे जाणा-या मार्गास "कै.शिवाजी पंढरीनाथ भालेराव पथ" असे नामकरण करणेस तसेच सोनीगरा सोसायटी पासुन सौ. चारुशिला कुटे यांचे संपर्क कार्यालयाकडे जाणा-या मार्गास "स्व.सिद्राम शिवाण्णा हडपद मार्ग" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २५ | विषय क्रमांक | : ४ |
| दिनांक | : १०/०७/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. चारुशिला कुटे | अनुमोदक | : मा. शारदा बाबर |

संदर्भ: मा. चारुशिला कुटे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १५ दत्तवाडी मधील क्रांतीनगर भागात मस्जिदसमोर असणा-या आरक्षण क्र.५४७ ची जागा भूसंपादित करुन त्या ठिकाणी महापालिकेची योजना राबविणेस मान्यता देणेकामी सदरचा विषय मा.शहरसुधारणा समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे ठेवणेस शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २६ | विषय क्रमांक | : ५ |
| दिनांक | : १०/०७/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. चारुशिला कुटे | अनुमोदक | : मा. शारदा बाबर |

संदर्भ: मा. चारुशिला कुटे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १५ दत्तवाडी मधील क्रांतीनगर भागात नाल्यावर पूल टाकण्याचे र.रु.१७,५०,०००/- (अक्षरी र.रु. सतरा लाख पन्नास हजार) चे काम आहे. परंतु ते अजुनही करण्यात आले नाही. सदरचा निधी हे पुलाचे काम न करता स्थापत्य विषयक इतर कामे करण्यास वर्ग करण्यास मान्यता देणेणेकामी सदरचा विषय मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २७ | विषय क्रमांक | : ६ |
| दिनांक | : १०/०७/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. चारुशिला कुटे | अनुमोदक | : मा. शारदा बाबर |

संदर्भ: मा. चारुशिला कुटे यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे संत तुकाराम व्यापार संकुलामध्ये असणारे अस्तित्व मॉल गेल्या चार वर्षापासून बंद आहे. त्यामुळे त्या ठिकाणी निगडी, दत्तवाडी, आकुर्डी भागातील गरीब विद्यार्थ्यासाठी अभ्यासिका वर्ग व ग्रंथालय सुरु करणेस व त्याचे "संत शिरोमणी नामदेव महाराज ग्रंथालय व अभ्यासिका वर्ग" असे नामकरण करणेस तसेच प्रभाग क्र.१५ मध्ये दत्तवाडीमधील दत्तमंदिराकडे जाणाऱ्या मार्गास "ह.भ.प.विठोबा तुकाराम कुटे पथ" व सौ. चारुशिला प्रभाकर कुटे यांचे घराकडे जाणाऱ्या मार्गास "स्व. स्वातंत्र्य सैनीक राजाराम रघुनाथ डाखवे पथ" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २८ | विषय क्रमांक | : ७ |
| दिनांक | : १०/०७/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. बाळासाहेब तरस | अनुमोदक | : मा. संगिता राजेंद्र भोंडवे |

संदर्भ: मा. बाळासाहेब जयवंत तरस यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १९ किवळे येथील सर्व्हे नं.९२ येथे स्मशानभूमीकडे जाणा-या १२ मी.रस्त्याचे आरक्षण प्रस्तावित केले आहे. या आरक्षणमुळे येथील कयम स्वरुपी रहिवासी असलेल्या लोकांची घरे बाधित होणार आहेत. महापालिकेने यापूर्वी जाहीर केलेल्या प्रारुप आराखड्यामध्ये हा १२ मी.रस्ता सर्व्हे नं. ९१ मध्ये होता. सर्व्हे नं. ९१ मध्ये कोणतेही घर नाही व नंतर पालिकेने विकास आराखड्यात हा रस्ता सर्व्हे नं. ९१ व ९२ च्या सिमेवरुन टाकण्यात आला आहे. त्यामुळे सर्व्हे नं. ९२ ची घरे व शेतक-यावर अन्याय होत आहे. त्यामुळे हा रस्ता महानगरपालिका नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करुन पुर्वीच्या सर्व्हे क्र.९१ मधील मोकळया जागेमध्ये स्थलांतरीत करणेस तसेच सर्व्हे नं. ८२ किवळे १८ मी. रत्याचे आरक्षण आहे. त्यामुळे एका शेतक-यावर अन्याय होत आहे. त्यामुळे तो रस्ता सर्व्हे नं. ८१ व ८२ मध्ये समांतर टाकणेबाबत पुढील कार्यवाही करणेकामी सदरचा विषय मा.शहरसुधारणा समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे पाठविणेस शिफारस करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

(सौ.सुभद्रा ईश्वर ठोंबरे)
सभापती
अ प्रभाग समिती

अक्षेका /११/ कावि/ २४१ /२०१४
दिनांक ०७ / ०८ /२०१४

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ क्षेत्रीय कार्यालय

प्रत- सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी